# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

**लोकमत**

### अमोल कोल्हे : हुतात्मा राजगुरु व बुट्टेपाटील महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

# शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांनी क्षितिजापलीकडचे ध्येय ठेवावे

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : विद्यार्थ्यांनी क्षितिजापलीकडचे ध्येय ठेवताना पाय जमिनीवर ठेवावेत, वेग वायूचा आणि ऊर्जा तारकांची ठेवली तर यशाची आयुष्याचा मार्ग दूर नसल्याचे प्रतिपादन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभाप्रसंगी अमोल कोल्हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी पंचायत समिती सभापती अंकुश राक्षे, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल राक्षे, पंचायत समिती उपसभापती ज्योती अरगडे, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, प्राचार्य एस. एम. जगताप, उपप्राचार्य प्रा.एस.एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

अमोल कोल्हे यांनी प्रथम महाविद्यालयातील विविध उपक्रमांचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. संस्था विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी करीत असलेल्या प्रयत्नांना सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना युवा संवाद मोहिमेची सुरुवात आजपासून केली असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हुतात्मा राजगुरु स्मारकाला २ कोटी रुपये मंजूर केले असल्याची माहिती सांगून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात खासदार क्रीडा महोत्सव व महाविद्यालयीन सांघिक नृत्य स्पर्धांचे आयोजन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, सूत्रसंचालन एम. एल. मुळुक यांनी, पारितोषिक वाचन प्रा. प्रतिमा लोणारी, सारिका गोरे, प्रा. दिलीप मुळुक पाहुण्यांचा परिचय प्रा. साईनाथ पाचारणे यांनी, तर आभार उपप्राचार्य एस.एन.टाकळकर यांनी मानले.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना बक्षीस पारितोषिक देताना खासदार डॉ. अमोल कोल्हे व मान्यवर.

- डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते अखिल भारतीय विद्यापीठस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत कांस्यपदकप्राप्त सारिका शिनगारे हिला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. या शिवाय राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्तरावर नेटबॉल, हँडबॉल, वेटलिफ्टिंग, अॅथलेटिक्स व पावरलिफ्टिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ऋषिकेश काळे, आरिफ मुजावर, अक्षय दरेकर, ओंकार नरके, अनिकेत दौंडकर, पृथ्वीराज पवार, जयेश्री गाडेकर, वैष्णवी ठाकूर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रतिक पिंगळे, अक्षय पिंगळे, वैभव होजगे यांचा सैन्य दलात समावेश झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग, तसेच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

- संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी संस्थेच्या वतीने महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटीने ज्ञान संपादन केल्यास कोणतीही समस्या कठीण वाटणार नसल्याचे सांगितले.

Hello Pune Gramin
Page No. 9 Feb 13, 2020
Powered by: erelego.com

**पुढारी**

# बुट्टे पाटील महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. या प्रसंगी पंचायत समिती सभापती अंकुश राक्षे, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, सर्व संचालक, अनिल राक्षे, अॅड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य एस. एम. जगताप, उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी संस्थेच्या वतीने महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटीने ज्ञान संपादन केल्यास कोणतीही समस्या कठीण वाटणार नसल्याचे सांगितले. यावेळी अखिल भारतीय विद्यापीठस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत कांस्यपदकप्राप्त सारिका शिनगारे हिला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. याशिवाय राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्तरावर नेटबॉल, हॅण्डबॉल, वेटलिफ्टिंग, अॅथलेटिक्स व पावरलिफ्टिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ऋषिकेश काळे, आरिफ मुजावर, अक्षय दरेकर, ओंकार नरके, अनिकेत दौंडकर, पृथ्वीराज पवार, जयेश्वरी गाडेकर, वैष्णवी ठाकूर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रतिक पिंगळे, अक्षय पिंगळे, वैभव होजगे यांचा सैन्य दलात समावेश झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग, तसेच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी, सूत्रसंचालन प्रा. एम. एल. मुळुक यांनी, पारितोषिक वाचन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. दिलीप मुळुक यांनी केले, पाहुण्यांचा परिचय प्रा. साईनाथ पाचारणे यांनी केला, तर आभार उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर यांनी मानले.

My Gramin Edition
14 Feb, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

सकाळ

# क्षितिजापलीकडील ध्येय निश्चित करा

## खासदार डॉ. कोल्हे यांचे राजगुरुनगरमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**राजगुरुनगर, ता. १५ :** ''शिरूर लोकसभा क्षेत्रातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात खासदार क्रीडा महोत्सव व महाविद्यालयीन सांघिक नृत्य स्पर्धांचे आयोजन करणार,'' असल्याची माहिती खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली. ''विद्यार्थ्यांनी क्षितिजापलिकडील ध्येय निश्चित करून वाट प्रकाशाची, वेग वायूचा आणि ऊर्मी तारुण्याची ठेवली तर यशस्वी आयुष्याचा मार्ग दूर नसल्याचे,'' त्यांनी सांगितले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. ''विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी 'युवा संवाद' मोहमेची सुरुवात केल्याचे आणि 'खेलो इंडिया'च्या माध्यमातून शिवकालीन खेळांची सुरुवात करणार,'' असल्याचे कोल्हे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हुतात्मा राजगुरू स्मारकाला २ कोटी रुपये मंजूर केल्याची माहितीही त्यांनी दिली.



**राजगुरुनगर (ता. खेड) : खेलो इंडिया स्पर्धेत निवड झालेली सारिका शिनगारे हिचा सत्कार करताना खासदार डॉ. अमोल कोल्हे.**

या वेळी डॉ. कोल्हे यांच्या हस्ते अखिल भारतीय विद्यापीठस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त सारिका शिनगारे हिला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. राष्ट्रीय व राज्य पातळीवरील यशस्वी खेळाडू ऋषिकेश काळे, आरिफ मुजावर, अक्षय दरेकर, ओंकार नरके, अनिकेत दौंडकर, पृथ्वीराज पवार, जयेश्वरी गाडेकर, वैष्णवी ठाकूर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रतीक पिंगळे, अक्षय पिंगळे, वैभव होजगे यांचा सैन्यदलात समावेश झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग, तसेच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी, सूत्रसंचालन प्रा. एम. एल. मुळूक यांनी केले. आभार उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर यांनी मानले.

Pune, District-Today
16/02/2020 Page No. 7

# क्षितिजापलिकडचे ध्येय ठेवा : खासदार डॉ. अमोल कोल्हे

राजगुरुनगर : विद्यार्थ्यांनी क्षितिजापलिकडले ध्येय ठेवताना वाट प्रकाशाची, वेग वायूचा आणि उर्मी तारुण्याची ठेवली तर यशस्वी आयुष्याचा मार्ग दूर नसल्याचे प्रतिपादन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभाप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी खेड पंचायत समितीचे सभापती अंकुश राक्षे, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर सर्व संचालक, अनिल राक्षे, ॲड. राजमला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, प्राचार्य एस. एम. जगताप, उपप्राचार्य प्रा.एस.एन.टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

खासदार अमोल कोल्हे यांनी प्रथम महाविद्यालयातील विविध उपक्रमांचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. संस्था विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी करीत असलेल्या प्रयत्नांना सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांशी



संवाद साधताना युवा संवाद मोहीमेची सुरुवात आजपासून केली असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हुतात्मा राजगुरू स्मारकाला २ कोटी रुपये मंजूर केले असल्याची माहिती सांगून प्रत्येक विधानसभा मतदार संघात खासदार क्रीडा महोत्सव व महाविद्यालयीन सांघिक नृत्य स्पर्धांचे आयोजन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तामिळनाडूतील जलिकट्टूच्या धर्तीवर बैलगाडे शर्यत सुरु करण्यास प्रयत्नशील असून बैल हा धावण्यासाठी सक्षम प्राणी असल्याचा अहवाल न्यायालयात महाराष्ट्र शासनाने सादर केला असल्याचे ते म्हणाले. मोशी ते चाकण रस्त्याचे सहापदरीकरण, चाकण चौकात उड्डाणपूल, शिवनेरी विकास आराखडा, खेलो इंडियाच्या माध्यमातून शिवकालीन खेळांची सुरुवात, भक्ती शक्ती कॉरिडॉर आदी विकासकामे प्रस्तावित असून चाकण, राजगुरूनगर वाहतुककोंडीवर लवकरात लवकर मार्ग निघेल असेही त्यांनी सांगितले.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी संस्थेच्या वतीने महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटीने ज्ञान संपादन केल्यास कोणतीही समस्या कठीण वाटणार नसल्याचे सांगितले. डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते अखिल भारतीय विद्यापीठस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत कांस्यपदकप्राप्त सारिका शिनगारे हिला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. या शिवाय राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्तरावर नेटबॉल, हॅण्डबॉल, वेटलिफ्टिंग, ॲथलेटिक्स व पावरलिफ्टिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ऋषिकेश काळे, आरिफ मुजावर, अक्षय दरेकर, ओंकार नरके, अनिकेत दौंडकर, पृथ्वीराज पवार, जयेश्वरी गाडेकर, वैष्णवी ठाकूर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रतिक पिंगळे, अक्षय पिंगळे, वैभव होजगे यांचा सैन्य दलात समावेश झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.

# क्षितिजापलिकडचे ध्येय ठेवा : खासदार डॉ. अमोल कोल्हे

**राजगुरुनगर । वार्ताहर**

विद्यार्थ्यांनी क्षितिजापलिकडले ध्येय ठेवताना वाट प्रकाशाची, वेग वायूचा आणि उर्मी तारुण्याची ठेवली तर यशस्वी आयुष्याचा मार्ग दूर नसल्याचे प्रतिपादन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभाप्रसंगी बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी खेड पंचायत समितीचे सभापती अंकुश राक्षे, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर सर्व संचालक, अनिल राक्षे, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, प्राचार्य एस. एम. जगताप, उपप्राचार्य प्रा.एस.एन.टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

खासदार अमोल कोल्हे यांनी प्रथम महाविद्यालयातील विविध उपक्रमांचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. संस्था विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी करीत असलेल्या प्रयत्नांना सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना युवा संवाद मोहीमेची सुरुवात आजपासून केली असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हुतात्मा राजगुरू स्मारकाला २ कोटी रुपये मंजूर केले असल्याची माहिती सांगून प्रत्येक विधानसभा मतदार संघात खासदार क्रीडा महोत्सव व महाविद्यालयीन सांघिक नृत्य स्पर्धांचे आयोजन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तामिळनाडूतील जलिकट्टूच्या धर्तीवर बैलगाडे शर्यत सुरु करण्यास प्रयत्नशील असून बैल हा धावण्यासाठी सक्षम प्राणी असल्याचा अहवाल न्यायालयात महाराष्ट्र शासनाने सादर केला असल्याचे ते म्हणाले. मोशी ते चाकण रस्त्याचे सहापदरीकरण, चाकण चौकात उड्डाणपूल, शिवनेरी विकास आराखडा, खेलो इंडियाच्या माध्यमातून शिवकालीन खेळांची सुरुवात, भक्ती शक्ती कारिडॉल आदी विकासकामे प्रस्तावित असून चाकण, राजगुरूनगर वाहतुककोंडीवर लवकरात लवकर मार्ग निघेल असेही त्यांनी सांगितले.

डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते अखिल भारतीय विद्यापीठस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत कांस्यपदकप्राप्त सारिका शिनगारे हिला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. या शिवाय राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्तरावर नेटबॉल, हॅण्डबॉल, वेटलिफ्टिंग, ॲथलेटिकस व पावरलिफ्टिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ऋषिकेश काळे, आरिफ मुजावर, अक्षय दरेकर, ओंकार नरके, अनिकेत दौंडकर, पृथ्वीराज पवार, जयेश्री गाडेकर, वैष्णवी ठाकूर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रतिक पिंगळे, अक्षय पिंगळे, वैभव होजगे यांचा सैन्य दलात समावेश झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग, तसेच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. संजय शिंदे  
प्रसिद्धी विभाग प्रमुख